Corrected

# MARATHI (CODE NO. 009)
## SUMMATIVE ASSESSMENT
## CLASS- X SET – I
## SECOND TERM (October 2010- March2011)
## SAMPLE QUESTION PAPER

## SECTION – A ( GRAMMAR )

1 पुढील वाक्याचा काळ कंसांतील सूचनेप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा. (कोणतेही पाच) (5)

(i) यावर्षी उन्हाळा फार तीव्र आहे. ( भूतकाळ करा.)
(ii) वर्गात एकूण किती विषय शिकवले जातात? (भविष्यकाळ करा.)
(iii)तिने आईला लांबलचक पत्र लिहिले. (वर्तमान काळ करा.)
(iv) काल डॉलरची किंमत कमी झाली होती. (भविष्य काळ करा)
(v) उन्हाळयाच्या सुटीत मी शिमल्याला जाईन. ( भूतकाळ करा.)
(vi) यंदा मान्सूनचा पाऊस जोरदार होईल. ( वर्तमान काळ करा.)

## SECTION-B (COMPOSITION)

2 तुम्ही काढलेले रेल्वेचे तिकिट बदलून घ्यायचे आहे त्यासाठी प्रवासी एजन्टला पत्र लिहा. (8)

किंवा

तुमच्या मैत्रिणीचा लोणची तयार करण्याचा व्यवसाय आहे त्याच्या वितरणाकरिता दुकानदारास पत्र लिहा.

3 पुढील उता-याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा. (7)

पाऊस किती लहरी! जूनची सात तारीख सरली, तरी पावसाचा पत्ता नव्हाता. एवढेच काय? पावसाची कुठे चिन्हेही दिसत नव्हती. उकाडयाने माणसे बेजार झाली होती. पावसाचे नक्षत्र कुठे दडी मारून बसले होते! जमीनीला भेगा पडल्या होत्या. उन्हाच्या गरम झळा आपले अस्तित्व जाणवून देत होत्या. उकाडा अतिशय वाढला होता. पावसाचे आगमन जसजसे लांबत होते, तसतसे लोकांच्या तोंडचे पाणी पळत होते. नानाविध प्रकारे लोक वरूण राजाची आराधना करीत होते.जमीन नांगरून शेतकरी

आकाशाकडे डोळे लावून बसला होता. 'कृपा कर रे मायबापा। किती वाट बघायला लावशील। काळी गाय आसुसली आहे रे तुझ्यासाठी!' एके दिवशी अचानक सभोवार अंधारून आले. सोसाटयाचा वारा सुटला सर्वांच्या चेह-यावर आनंदाची लहर उमटून गेली. मनावरून सुखाचे मोरपीस फिरले. 'आला का रे तो घननीळ!'.... आणि अचानक पाऊस कोसळू लागला. टपोरे थेंब बरसू लागले. खूप उशीर झाल्यामुळे त्यांना कोसळण्याची घाई झाली होती. हा काळया ढगांचा तानसेन जणू मेघमल्हाराच्या ताना घेत असावा. आगमनाला उशीर झाल्यामुळे तो शरमला असावा, म्हणून सतत अखंडपणे अविरत कोसळत होता. तीन तासांनंतर पाऊस ओसरला. अचानक आला तसा अचानक थांबला.

4 पुढील मुद्द्यांवरून गोष्ट लिहा. (10)

राजाने पाळलेला वानर --- वानराच्या अंगी बुद्धीमत्ता, चातुर्य हेगुण --- राज त्याला विश्वासू सेवक नेमतो ---दुपारच्या वेळी राजाची विश्रांती --- वानराचा शेजारी पहात--- राजाच्या तोंडावर माशी --- वानर शेज़ारची तलवार घेऊन तिच्यावर वार करतो--- गोष्टीचे तात्पर्य-

## SECTION-C (COMPREHENSION)

5 पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा-

नम्र व्यवहारच अंतिमतः फलदायी ठरतो- नम्र व संयमी माणूस सौजन्यशील असतो. त्याचे मन खुले असते व वागणे स्नेहपूर्ण असते. वास्तवतेचे भान त्याला सदैव असते. दुस-यांच्या चांगुलपणावर तो विश्वास ठेवत असल्यामुळे त्याची अवहेलना किंवा अपमान न करता तो त्यांना योग्य ते महत्व देतो. स्वार्थ व उद्धटपणा यापासून तो चारहात दूर राहतो. याउलट असमंजस माणसाचे वर्तन याच्या विपरीत म्हणजे ओध्दत्य, फुशारकी, निंदा-नालस्ती यांनी युक्त असते. काय झाले तर आपल्यामुळेच पण न झाले तर दुस-याला शिव्या देण्याची संधी तो सोडत नाही.

सध्याच्या युगात सिध्दीबरोबर प्रसिध्दी लागत असते हे खरे, परंतु म्हणून नम्रतेला, शिष्टाचाराला फाटा द्यावयाचा असा त्याचा अर्थ नाही. नम्रता म्हणजे भित्रेपणा नव्हे. तत्वाचा ताठरपणा कायम ठेवूनही व्यवहारात नम्रपणा धारण करता येतो. एका कॉंग्रेस कार्यकारिणीत महात्मा गांधी व सरदार पटेल यांची खडाजंगी झाली. या संदर्भात महात्मा गांधींनी श्री. वल्लभभाईना पत्र लिहिले.

वरील पत्रास वल्लभभाईनी तत्परतेने पुढीलप्रमाणे उत्तर पाठविले. "मी तुमच्या पत्रावर काय बोलणार? बहुत करून माझेच चुकले असणार पण ते माझ्या लक्षात आले नाही. याचे मला खूप वाईट वाटते. मी जरा तापूनच बोललो. तो माझ्या स्वभावाचा दोष आहे. माझ्या मनात मात्र काही नाही.

अ) पुढील प्रश्नांच्या उत्तरापैकी योग्य पर्याय निवडा. (4)

(i) नम्र माणसाचे वागणे कसे असते?

अ)सौजन्यशील
ब) स्वार्थी
क) उध्दट
ड) फुशारकीचे

(ii) महात्मा गांधी व सरदार पटेल यांच्यातील पत्र व्यवहार कशा स्वरूपाचा होता?

अ)खडाजंगेचा
ब) नम्रतापूर्ण
क) सडेतोड
ड) उपरोधिक

(ब) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. (6)

(i) नम्रता म्हणजे काय काय नव्हे असे लेखकाने म्हटले आहे.
(ii) या उता-यातील विरोधी अर्थाच्या शब्दांच्या जोडया शोधून लिहा.

## SECTION-D (LITERATURE )

6 पुढील पैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. (15)

(i) लहानपणी गुलजार आणि त्यांचे मित्र कोणकोणते खेळ खेळत?
(ii) हरिहर रावांच्या जीवनाचे स्वरूप कसे होते?
(iii) शेळया चारताना भास्कराच्या मनात कोणते विचार आले?
(iv) अक्काच्या हुकमी वाक्यामुळे लेखकाच्या मनात कोणते विचार येत?

7 (अ) वाणीने कशासाठी शस्त्र बनावे ? (2)

(i) साखरपेरणी साठी
(ii) संघर्षा साठी
(iii) न्याय नीतीसाठी
(iv) अभंग लेखनासाठी

(ब) पुढील पैकी कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तरे थोडक्यात लिहा. (3)

(i)आत्मसन्मानाने जगण्यासाठी कवीने कोणता मार्ग सांगितला आहे?
(ii)अंधार पखाली या कवितेत कोणती अपेक्षा व्यक्त झाली आहे.

(क)पुढील पैकी कोणत्याही दोन अवतरणांचा संदर्भ सांगून त्यातील अर्थ सौंदर्य स्पष्ट करा. (10)

(i) "तुकोवा ज्योतिवा मनो-भावे स्मरो"
(ii) "ज्योत ज्योतीने जागवा, करा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा"
(iii) "पक्की टेव खूणगाठ
तुझी असू दे मान ताठ"

8 (अ) प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वणेन माधुरी शानबाग यांनी कसे केले आहे ? (6)

(ब) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता? (4)